# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/08/2023 (बुधवार) दुपार

## घरफोडी

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर नरेंद्र कुरूडकर, यांच्या घरी किरायाने कावळापेठ उमरेड येथे दिनांक २२/०८/२०२३ चे १०.०० वा. ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मयुर चंद्रशेखर चचाने, वय २९ वर्ष, रा. कावळापेठ उमरेड ह. मु. नरेंद्र कुरूडकर यांच्या घरी किरायाने कावळापेठ हे नरेंद्र कुरूडकर यांच्या घरी किरायाने कावळापेठ येथे परिवारासह राहत होते. फिर्यादीचे मोठे भाऊ व वहिनी व ताई हे सर्वे मामा मरण पावल्याने नागपुर येथे गेले होते. त्यामुळे फिर्यादी घरी एकटेच हजर होते. सकाळी १०/०० वा. फिर्यादीच्या भावाच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने एम. आय. डी. सी. येथील साइडवर गेले व साईडवरील बांधकाम पाहुन लेबरला काम सांगुन घरी ११/०० वा. च्या सुमारास परत आले त्यावेळेस फिर्यादीला घराचे मेन गेट उघडे दिसले घरामधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व लोखंडी कपाट उघडुन त्याच्यातील सामान बाहेर काढलेले दिसले त्याच कपाटात ठेवलेले ८०,०००/– रू मुद्देमाल मिळुन आला नाही. सोन्याचे दागीने किंमती माहित नाही कोणीतरी अज्ञात चोराने दिवसा घरात प्रवेश करून चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर मूळे मो. नं. ८८३०७६९९०५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर भदोरिया ले आउट भिवापुर रोड उमरेड येथे दिनांक २१/०८/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक २२/०८/२०२३ चे दुपारी १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पियुष विकास वाघमारे, वय २७ वर्षे, रा. भदोरिया ले आउट भिवापुर रोड उमरेड यांचे घराचे कुलुप तोडुन घरामधील ०२ गॅस शेगडी ६०००/–रू इंडेन गॅस सिलेंडर ३०००/–रू ०१ गुंड पितळी किंमती २०००/– रू नगदी ५०००/–रू व फिर्यादीचा मित्र नामे – सोहनलाल गणेशप्रसाद गुप्ता याचे गोडावुन मधील दरवाजा तोडुन इंडेन गॅस सिलेंडर किंमती ३०००/– रू असा एकुण १९,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने रात्रीचे वेळी घरात व गोडावुन मध्ये प्रवेश करून चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पांडे मो. नं. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर